


Title Code- MAHMAR-51647

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ   Mob- 9822720784   Email- jansanchlan@gmail.com

वर्ष २ रे   अंक : ६८६. वा   बुधवार   दि. २१ फेब्रुवारी २०२४   पृष्ठ ८   किंमत ३ रुपये

# जिल्हा रुग्णालयही भ्रष्टाचाराबाबत गिरवतोय महसूलचा कित्ता...

## भ्रष्टाचाऱ्यांना अभय, कारवाई देखील शून्य...

## करोडो रुपये भ्रष्टाचार प्रकरणातील दोषींवर कुंभकर्णी झोपेत असलेले आरोग्य प्रशासन जो पर्यंत कारवाई करत नाही आमचा लढा असाच कायम राहील...

**जनसंचलन/ बुलढाणा**

एकीकडे बुलढाण्याच्या जिल्हा महसूल विभागात भ्रष्टाचाराने कहर गाठलेला तर आ-हेच आणि भ्रष्टाचाऱ्यांवर कोणतीही कारवाई होताना दिसून येत नाही, परंतु तोच कित्ता सध्या जिल्हा सामान्य रुग्णालयातही गिरवला जातोय असे स्पष्टपणे दिसून येत आहे. या ठिकाणीही विविध विभागांमध्ये झालेल्या भ्रष्टाचार प्रकरणी सातत्याने भ्रष्टाचाऱ्यांना वाचवण्याचे काम केले जात आहे. महसूल विभाग असो की कॅश विभाग सगळीकडे भ्रष्टाचाराचा बोलबाला असून, कनिष्ठ अधिकारी आपल्याच वरिष्ठ अधिकाऱ्यांचे आदेश उघडपणे धुडकावत असल्याचे दिसत आहे. सर्वसामान्य व गोरगरीब नागरिकांचे आरोग्याची काळजी घेतली जावी, यासाठी कार्यरत राहणे हे खरेतर जिल्हा रुग्णालयाचे आद्य कर्तव्य आहे. मात्र, गेल्या अनेक वर्षांपासून जिल्हा रुग्णालयात बोकाळलेली अव्यवस्था, माजलेली अनागोंदी, भ्रष्टाचार, अधिकाऱ्यांची मनमानी आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांचा भ्रष्टारात उघडपणे सहभाग या प्रकारामुळे जिल्हा रुग्णालय बरेच चर्चेत आलेले आहे. कोरोना महामारीच्या आधीपासूनच या ठिकाणी बोकाळलेल्या भ्रष्टाचाराला महामारीच्या काळात तर चांगलेच धुमारे फुटले. जिल्हा शल्यचिकित्सक असो की, प्रभारी जिल्हा शल्यचिकित्सक सर्वांनीच भ्रष्टाचाराला एक तर खतपाणीच घालण्याचे काम केले किंवा त्या भ्रष्टाचाराकडे अर्थपूर्ण दुर्लक्ष केले. या प्रकारामुळे कनिष्ठ अधिकारी आणि

**पोस्टमार्टम ६५**

डॉक्टर हे सर्वच एव्हढे मस्तवाल झाले की, त्यांनी ते आपल्याच अधिकाऱ्यांना ठेंगा दाखवू लागले. एकीकडे जिल्हा रुग्णालयात औषधी व उपकरणांमध्ये कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार झालेला आहे. मोठ्या प्रमाणात खरेदी करण्यात आलेले साहित्य आणि औषधी ही कधीच जिल्हा रुग्णालयात पोहोचली नाही. या उपकरणे व औषधांचा असली मलिदा कोणी खाल्ला, हे अख्ख्या रुग्णालय प्रशासनाला माहिती आहे, परंतु कोणीही यासंदर्भात कारवाई करण्यास धजावत नाही. जिल्हा रुग्णालयातील भ्रष्टाचाराचे हे वैशिष्ट्य आहे की, येथे भ्रष्टाचार हा सामूहिकरित्या चालतो. वरपासून खालपर्यंत भ्रष्टाचाराचे दवबिंदू झिरपत-झिरपत येत राहतात. या दवबिंदूंमध्ये अनेक अधिकारी हे चिंब-चिंब न्हाऊन निघतात. त्यामुळे कोणीही वरिष्ठ अधिकारी हा खालच्या अधिकाऱ्यावर कारवाई करण्याची हिम्मत दाखवत नाही. एकीकडे हा प्रकार सुरू असताना दुसरीकडे मोठ्या प्रमाणात जिल्हा रुग्णालयाच्या कॅशबुकात घोटाळे करण्यात आले. यातून कोट्यवधी रुपयांचा हेरफेर झाला. चढ्या दराने बिले अदा करण्यात आली. या बिलांमधील तफावतीमुळे जो काही भ्रष्टाचार झाला, त्या भ्रष्टाचाराच्या गटारगंगेतील पाणी हे अनेक

**तत्कालीन जिल्हाशल्य चिकित्सक डॉ. प्रेमकुमार पंडित व डॉ.नितीन तडस यांच्या कार्यकाळातील करोडो रुपयांचे भ्रष्टाचार व बुलडाणा लोकप्रतिनिधी यांनी दोन वेळा लावलेला तारांकित प्रश्न त्यावर होणारी न उलगडणारी चौकशी अजूनही गुलदस्त्यात याचा पडदाफाश पुढील प्रत्येक सत्रात**

अधिकाऱ्यांच्या उंबऱ्यापर्यंत पोहोचले. अनेकांनी या गटारगंगेत आपले हात धुवून घेतले. त्यात प्रामुख्याने पी. के. माळी यांचे नाव समोर येते. हे माळी महाशय आज जिल्हा रुग्णालय प्रशासनाला हुलकावणी देण्याचे काम करीत आहेत, तर विद्यमान जिल्हा शल्यचिकित्सक हतबल होऊन या भ्रष्टाचाराकडे पाहत आहेत. विद्यमान रोखपाल लाकडे हे सध्या या भ्रष्टाचाराचे मेरुमणी बनलेले आहेत. जिल्हा रुग्णालयाच्या भ्रष्टाचारात अनेक वर्षे सहभागी असलेले तत्कालीन मेडिकल ऑफीसर डॉ. सचिन वासेकर हे नुकतेच लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या कचाट्यात सापडले आहेत. सध्या वासेकर हे जात्यात आहेत, तर इतर अनेक जण सुपामध्ये आहेत. कुणाच्याही भ्रष्टाचारावर जिल्हा रुग्णालयात कुठलीही कारवाई होताना दिसून येत नाही. भ्रष्टाचार हा शिष्टाचाराचे कपडे परिधान करून जिल्हा रुग्णालयात मुक्तपणे वावरत आहे. जिल्हा शल्यचिकित्सकांची हतबल अवस्था पाहून सर्वच जण मनमानी करीत असल्याचे दिसत आहे. जिल्हा रुग्णालयातील अनेक डॉक्टर शास-




नाचा पगार आणि व्यवसायरोधी भत्ता घेऊनसुद्धा उघडपणे खासगी रुग्ण तपासणी करून वरतून पैसे उकळत आहे. परंतु कारवाई मात्र शून्य आहे. एकीकडे महसूल विभागात भ्रष्टाचाराला उघडपणे अभय मिळते आहे, भ्रष्टाचाऱ्यांना वाचवण्याचे काम होत आहे, भ्रष्टाचारातून प्रचंड प्रमाणात संपत्ती जमवण्याचे काम सुरू आहे, याउपरही भ्रष्टाचाऱ्यांवर कोणतीही कारवाई होत नसताना तोच कित्ता जिल्हा रुग्णालयात गिरवला जात आहे. स्वच्छ व गतिमान प्रशासनाचे ढोल बडवणाऱ्या राज्य शासनाला आपल्याच विविध विभागांमध्ये बोकाळलेला भ्रष्टाचार कसा दिसत नाही किंवा निपटून काढता येत नाही, हा खूपच मोठा प्रश्न आहे. कितीही बिकट परिस्थिती असली तरी दैनिक जनसंचलन मात्र भ्रष्टाचाराविरोधात एकाकी लढा देत आहे. हा निकराचा लढा भविष्यातदेखील काम ठेवला जाईल, याचा संकल्प आम्ही करीत राहणार आहे.

अजून बरेच काही पुढील भागात...

# उपवासाच्या फराळातून खापरखेड सोमठाणा येथील जवळपास ३०० लोकांना विषबाधा...

**जनसंचलन/ लोणार**

लोणार तालुक्यातील खापरखेड व सोमठाणा या गावच्या मध्ये भगवान काळू नाडे यांच्या शेतातील विठ्ठल रुक्माई च्या मंदिरा सुरू असलेल्या सप्ताह्या निमित्त केलेल्या प्रसादातून विषबाधा होऊन खापरखेड व सोमठाणा येथील महिला पुरुष व बालकासह तीनशे लोकांना विषबाधा झाल्याची घटना दिनांक २० फेब्रुवारी रोजी रात्री घडली आहे. लोणार तालुक्यातील सोमठाणा येथील भगवान नाडे यांच्या शेतात असलेल्या विठ्ठल रुक्माई च्या मंदिरात १४ फेब्रुवारी पासून सप्ताह सुरू होता. आज सप्ताहाचा सातवा दिवस होता. आज एकादशी असल्याने भावीक भक्तांसाठी भगरीचा प्रसाद केलेला होता. परंतु हा प्रसाद खाल्ल्यामुळे सोमठाणा व खापरखेड येथील महिला पुरुष व बालकांसह जवळपास ३०० लोकांना विषबाधा झाली. विषबाधित लोकांना बीबी येथील ग्रामीण रुग्णालयामध्ये उपचारासाठी भरती करण्यात आलेले. रुग्णांना दवाखान्यात आणले असता सदर रुग्णालयामध्ये मेडिकल ऑफिसर उपलब्ध नसल्याने खाजगी डॉक्टरांना मदतीसाठी पाचारण करण्यात आले. रुग्णाची संख्या मोठ्या प्रमाणात असल्याने रुग्णालयात बेड व जागेच्या कमतरतेमुळे गावातील तरुण मंडळींनी दवाखान्याच्या बाहेर मोकळ्या पटांगणामध्ये ताडपत्री टाकून झाडाला दोरी बांधून रुग्णांना तिथे सलाईन देऊन उपचार सुरू केले आहे.पुढील उपचार घेत असून दवाखान्यात बीड अभावी



मोकळ्या स्पेस मध्ये उपचार देणे सुरू आहे प्रशासनाने तात्काळ डॉक्टर उपलब्ध करून देऊन रुग्णांची होणारी हेळसांड थांबवावी

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# मंठा तहसीलदार सोनाली जोंधळे यांची लोणार तालुक्याच्या हद्दीमध्ये अवैद्य रेती वाहनावर धडाकेबाज कारवाई !

**जनसंचलन/ लोणार**

मराठवाड्यातील जालना जिल्ह्यातील मंठा तालुक्याच्या तहसीलदार सोनाली जोंधळे यांनी विदर्भातील लोणार तालुक्याच्या हद्दीमध्ये अवैद्य रेती वाहतूक करणारे वाहन पकडून कारवाई करत गुन्हे दाखल केल्याने रेती माफियांच्या चांगल्याच मुसक्या आवळल्याचा विषय चर्चेचा झाला आहे. याबाबत सविस्तर वृत्त असे कि, मराठवाड्यातून दररोज अंदाजे ५० वाहने हे दिवसरात्र अवैद्य रेती वाहतूक करीत सीमा ओलांडून विदर्भातील लोणार तालुक्यात घुसतात. अवैद्य रेती उपसा आणि वाहतुकीमुळे शासनाचा करोडो रुपयांचा महसूल बुडत असल्याने याला पायबंद घालण्यासाठी मंठा तहसीलच्या तहसीलदार सोनाली जोंधळे ह्या एक्शन मोडवर आल्या आहेत. त्यांनी नियोजनबद्ध रेती माफियांवर कारवाई चा धडाका लावला असल्याचे दिसून येत आहे. १९ फेब्रुवारी २०२४ रोजी दुपारी ४ वाजेच्या दरम्यान मंठा तहसीलदार सोनाली जोंधळे, तलाठी नितीन चिंचोले, पुरवठा विभागातील कर्मचारी सचिन कळणे हे अवैद्य रेती वाहतूक रोखण्यासाठी खाजगी वाहनाने तळणी हद्दीमध्ये पेट्रोलिंग करीत होते. दरम्यान त्यांना विदर्भातील लोणार कडे विना वाहन क्रमांक असलेले पिवळ्या रंगाचे टिप्पर भरधाव वेगात जात असल्याचे दिसून आले. सदर वाहन थांबविण्यासाठी त्यांनी इशारा केला. मात्र ते वाहन लोणार च्या दिशेने सुसाट वेगाने पळून गेले. सदरील वाहनाचा पाठलाग केला असता ते वाहन लोणार तहसिल हद्दीतील हॉटेल तुळजाई समोर त्यांनी पकडले. त्या विना वाहन क्रमांक असलेल्या पिवळ्या रंगाच्या वाहनावरील चालक संतोष देविदास चंदनपाट रा.तळणी, ता.मंठा, जिल्हा जालना याला रेती वाहतुकी बाबत विचारणा केली असता. त्याच्याकडे रेती वाहतुकी बाबत कुठलाही परवाना आढळून आला नाही. दरम्यान त्याचवेळी तळणी येथील अर्चना बालासाहेब राऊत यांनी सदर महसूल पथकास सरकारी कामात अटकाव केला. या संदर्भात मंठा तहसीलदार सोनाली जोंधळे यांनी लोणार पोलिस स्टेशन ला कळवून सदर वाहन लोणार पोलिस स्टेशनच्या ताब्यात देत फिर्याद



दिली. सदर फिर्यादीवरून लोणार पोलिस स्टेशनला अपराध क्रमांक ६१ / २४ नुसार कलम ३७९ /१८६ भां.द.वी. सहकलम ३, ४, गौणखनिज अधिनियम १९५२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास लोणार पोलिस स्टेशनचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक निमिष मेहेत्रे यांच्या मार्गदर्शनखाली पोहेकॉ गजानन सानप, पोकॉ तेजराव भोकरे करीत आहेत. मंठा तहसीलदार सोनाली जोंधळे यांच्या धडाकेबाज कारवाई चे सर्वत्र कौतुक होत असून एखाद्या अधिकाऱ्याच्या मनात आले तर कार्यक्षेत्राच्या बाहेर सुद्धा जाऊन अवैद्य रेती वाहनावर कारवाई करता येऊ शकते. हे या कारवाई वरून सिद्ध होत आहे. सदर धडक कारवाई मुळे अवैद्य रेती वाहतूक करणाऱ्या रेती माफियांचे धाबे दणाणले आहेत.

# बिबी येथे भाजपाचे गाव चलो अभियानाला मित्रपक्ष राष्ट्रवादी, शिवसेनेचा सहभाग...

**जनसंचलन/ सिंदखेडराजा**

बिबी किनगाव जट्टू जिल्हा परिषद सर्कल अंतर्गत भाजपाचे पदाधिकार्यांनी गाव चलो अभियान राबविले.या अभियानाला उस्फुर्त प्रतिसाद मिळाला या अभियानाला मित्रपक्ष च्या पदाधिकार्यांनी सहभागी होऊन शासनाच्या विविध योजनांची माहिती दिली भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे पी नड्डा यांच्या आदेशाने संपूर्ण देशभर व राज्याचे उपमुख्यमंत्री तथा नेते देवेंद्र फडणवीस,प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे,माजी मंत्री संजय कुटे,आ.आकाश फुंडकर, आ.श्वेता ताई महाले,लोकसभा प्रभारी विजय राज शिंदे,यांच्या सुचनेनुसार जिल्हा अध्यक्ष गणेश मांटे,यांच्या आदे-



शाने भाजपाचे युवा नेते देवानंद सानप,तालुका सरचिटणीस बाळासाहेब कुलकर्णी, यांच्या नेतृत्वात गाव चलो अभियान राबविण्यात आले या अभियानाला राष्ट्रवादी काँग्रेस चे पदाधिकारी जाकेर भाई, विठ्ठल वायाळ, बबन आटोळे, तर शिवसेनेचे निळकंठ मुळे,सह भाजपाचे प्रमोद महाजन, प्रसाद कुलकर्णी, रामेश्वर काळुशे, अनिल कठाळु सह कार्यकर्ते उपस्थित होते

# जिल्हाधिकारी कार्यालयात बाळशास्त्री जांभेकरांना अभिवादन...



**जनसंचलन/बुलडाणा**

जिल्हाधिकारी कार्यालयात आचार्य बाळशास्त्री जांभेकरांना अभिवादन करण्यात आले. तहसिलदार माया माने यांनी बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी तहसिलदार संजिवनी मुपळे, वर्षा मुळे, नाझर गजानन मोतेकर आदी उपस्थित होते. उपस्थितांनी आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेला अभिवादन केले.

# मौजे रुईखेड टेकाळे येथील शाळेची इमारत व प्रवासी निवारा अवैधरित्या तोडले...


## माजी सरपंच यांनी केली जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निवेदनाद्वारे तक्रार...

**जनसंचलन/बुलडाणा**

मौजे रोके टेकाळे येथील अंदाजे २० ते २५ वर्षांपूर्वी शाळेचे इमारतीचे व प्रवासी निवारा इमारतीचे बांधकाम करण्यात आले होते. हे बांधकाम अवैद्यरित्या तोडल्याप्रकरणी बबनराव रुपराव टेकाळे माजी सरपंच यांनी जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निवेदन दिले आहे व सदर घटनेची योग्य चौकशी करून झालेल्या सार्वजनिक मालमत्ता नुकसानीची भरपाई करण्यात यावी. सदर दोन्ही इमारती सुस्थितीत व वापरामध्ये होत्या सदरीमारतीपासून कोणतेही प्रकारचा अडथळा नव्हता किंवा कोणताही धोका नव्हता सदर इमारती हनुमान मंदिराच्या दक्षिण बाजूस बांधलेल्या होत्या दोन्ही मदतीचे बांधकाम आर. सी.सी मध्ये करण्यात आले होते. सदर दोन्ही इमारती सरपंच सौ जयश्री संतोष टेकाळे यांनी यांनी असंच हेतूने पाडून सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान केलेले आहे. सदर इमारतीचे लोखंड व तीन पत्राची विक्री सुद्धा सरपंच यांनी केलेली आहे अशी संपूर्ण गावामध्ये चर्चा होत आहे. पाडण्यात आलेले इमारतीचे मलबा आज रोजी सुद्धा मुख्यावर पडलेल्या आहे कारवाईस विलंब झाल्यास आज रोजी उपलब्ध असलेले पुरावे लोखंड व तीन पत्रासारखी नष्ट होऊ शकतात सदर



सदर मालबत्त्यातून विटा काढून वेशीवर चौथाऱ्याचे बांधकाम सुरू आहे. सदर बांधकाम पडल्यामुळे शासनाचे अंदाजे ३५ ते ४० लक्ष रुपयांची नुकसान झालेले आहे. त्यामुळे सदर प्रकरणाची गांभीर्याने तात्काळ दखल घेऊन मोका पाहणी करून संबंधित विभागामार्फत प्रथम खबर देऊन सार्वजनिक मालमत्ता नुकसान कायदा व भा द संहिता १८६० मधील १४३ १४९ ३४१ ४३१ आणि सार्वजनिक मालमत्ता नुकसान प्रतिबंधक कायदा १९८४ ची कलम ३(२) क आनवे गुन्हा दाखल करून सार्वजनिक मालमत्तेचे नुकसानी पोटी परीगणित केलेली रक्कम वसूल करण्यात यावी अशी माहिती दिलेल्या निवेदनुसार आहे.




*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

# परीक्षेला कॉपी नाही,अन् चुकीला माफी नाही

## मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल नरवाडे यांचा सज्जड इशारा

**जनसंचलन/बुलडाणा**

देशाची भावी पिढी ही गुणवत्तापूर्ण व दर्जेदार शिक्षणातून घडली पाहिजे. त्यामुळे परीक्षा केंद्रावर होणारे गैरप्रकार व कॉपीची कुप्रथा मोडीत काढण्यासाठी जिल्हा प्रशासनाने कंबर कसली असून यापुढे परीक्षेला कॉपी नाही , अन् चुकीला माफी नाही असा सज्जड इशारा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल नरवाडे यांनी दिला आहे. उच्च माध्यमिक शालांत परीक्षेच्या पूर्वसंध्येला आज जिल्हा परिषदेतील वॉर रूममध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल नरवाडे यांनी कॉपीमुक्त परीक्षा अंमलबजावणीबाबतच्या पत्रकार परिषदेला संबोधित केले. यावेळी माध्यमिक शिक्षणाधिकारी सिध्देश्वर काळुसे, प्राथमिक शिक्षणाधिकारी बाळासाहेब खरात, उपशिक्षणाधिकारी उमेश जैन, शिक्षण निरीक्षक जगन मुंढे प्रामुख्याने उपस्थित होते. यावेळी पत्रकारांशी संवाद साधतांना विशाल नरवाडे म्हणाले की, परीक्षेच्यावेळी दिवसेंदिवस वाढत चाललेले गैरप्रकार चिंताजनक आहेत. ही स्थिती पालकांसह आपल्या सर्व समाजासाठी धोकादायक आहे. परीक्षेत कॉपी करता येते, त्यामुळे मी पास होणारच! हा चुकीचा आत्मविश्वास विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होत असून तो विद्यार्थ्यांच्या भवितव्याच्यादृष्टीने घातक आहे. कॉपीची कुप्रथा मोडीत काढणे ही काळाची गरज असून सोबतच शिक्षण व्यवस्थेवरचा विश्वास वाढविणे हे सर्वांसमोरचे मोठे आव्हान आहे. हे आव्हान स्विकारून गैरप्रकारांना वेळीच पायबंद घालणे आवश्यक असल्याची भूमिका त्यांनी विशद केली. कॉपीमुक्त अभियानासाठी जिल्हा प्रशासनाची तयारी काय? या पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नावर बोलतांना विशाल नरवाडे म्हणाले की, दरवर्षीप्रमाणे यावर्षीही शिक्षण विभागाव्यतिरिक्त इतर विभागांच्या अधिकारी-कर्मचा-यांचा सहभाग घेऊन विविध स्तरावर बैठे पथक,




भरारी पथक, पोलीस सुरक्षा अशा नियमित उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत. तसेच विशेष दक्षता आवश्यक असलेले परीक्षा केंद्र, संवेदनशील परीक्षा केंद्र व सर्वसाधारण परीक्षा केंद्र अशी वर्गवारीसुध्दा करण्यात आलेली आहे. मात्र त्या व्यतिरिक्त यावेळी बुलढाणा जिल्ह्यात प्रथमच ऑनलाईन संनियंत्रणाचा अभिनव प्रयोग करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. त्यासाठी बुलढाणा जिल्ह्यातील इयत्ता १२ वी च्या ११७ परीक्षाकेंद्रावर सुमारे १३५० वर्गखोल्यांमध्ये ३३ हजार ७५७ विद्यार्थी परीक्षा देणार आहेत. सर्वच परीक्षा केंद्रावर व वर्गखोल्यामध्ये उपलब्ध होऊ शकत नाहीत. अशावेळी झूम ऑनलाईन मॉनिटरींग सिस्टिमची चाचपणी सुरु आहे. यामाध्यमातून परीक्षा वेळेत प्रत्येक परीक्षा केंद्रातील प्रत्येक खोलीतील घडामोडी पेपरच्या वेळेत सकाळी १० .३० ते २.३० या वेळेत रेकॉर्ड करण्यात येणार आहेत. त्यासाठी जिल्हास्तरावर अथवा आवश्यकतेप्रमाणे तालुकास्तरावर नियंत्रण कक्ष स्थापित करण्यात येणार आहेत. या कक्षामध्ये परीक्षा काळातील लाईव्ह फीड मॉनिटर व रेकॉर्ड केला जाणार आहे. हे करतांना परीक्षाविषयक सर्व नियमांचे पालन होईल, सोबतच प्रशासनावर कोणताही आर्थिक भार येणार नाही इत्यादी बाबींची तपासणी सुध्दा सुरू असल्याचे विशाल नरवाडे यांनी सांगितले. हा प्रयोग विद्यार्थ्यांच्या उज्वल भवितव्यासाठी असून यामध्ये प्रशासनाबरोबरच सर्व पालक, शिक्षक संघटना , सामाजिक संघटना, प्रसामाध्यमे अशा सर्व घटकांची सकारात्मक भुमिका महत्वपूर्ण ठरणार आहे. त्यामुळे या उपक्रमात सर्वांनी आपआपल्यापरीने सहकार्य करावे, असे आवाहन सुध्दा विशाल नरवाडे यांनी केले. त्याचप्रमाणे उपलब्ध कालावधी, संसाधने लक्षात घेता हा प्रयोग पहिल्याच वर्षी १०० टक्के यशस्वी होईल आणि आम्ही क्रांतिकारक बदल करू असा दावा सुध्दा आम्ही करणार नाही. मात्र कुठेतरी एका चांगल्या, निकोप , भयमुक्त व कॉपीमुक्त परीक्षेसाठी उचललेले हे पाऊल भविष्यात निर्णायक ठरेल , असा विश्वास सुध्दा मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल नरवाडे यांनी व्यक्त केला. तसेच इयत्ता १० व १२ वी परीक्षा होईपर्यंत परीक्षा यंत्रणेतील सर्व घटकांवर विविध माध्यमांव्दारे लक्ष ठेवण्याचा प्रयत्न प्रशासनाकडून होत असल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे यापुढे परीक्षेला कॉपी नाही , अन् चुकीला माफी नाही असा सज्जड इशारा देऊन मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल नरवाडे यांनी भविष्यात आपल्या कार्यशैलीबाबतचा सूचक इशारा दिला आहे. पत्रकार परिषदेच्या अखेरीस त्यांनी सर्व परीक्षार्थ्यांना शुभेच्छा सुद्धा दिल्या.

# जिजाऊ इंटरनॅशनल स्कूल येथे वार्षिक स्नेसंमेलन उत्साहात साजरा

**जनसंचलन/ सिंदखेडराजा**




तालुक्यातील दुसरबीड येथील जिजाऊ इंटरनॅशनल स्कुल येथे वार्षिक स्नेहसम्मेलनातून विद्यार्थ्यांच्या कलाविष्काराला चालना देण्यात आली, वार्षिक स्नेहसंम्मेलनाच्या उद्घाटनप्रसंगी माँ सरस्वती राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेचे पुजन करून दिपप्रज्वलन करण्यात आले. याप्रसंगी मुख्य अतिथी श्री.महादेवजी थोरवे सर (माजी प्राचार्य दे.राजा हायस्कूल व ज्यू.कॉलेज), श्री.रंगनाथजी गावडे सर ( गटशिक्षणाधिकारी सिं.राजा), डॉ.श्री.सुनिलजी कायंदे सर (उपाध्यक्ष भा.ज.पा.ओबीसी मोर्चा महाराष्ट्र)सौ. सरस्वतीताई मखमले (सरपंच दुसरबीड),डॉ.सौ. शिल्पाताई कायंदे मॅडम( संचालिका जि.इं.स्कूल), श्री.शिवराजजी कायंदे सर (सचिव भ.शि.प्र.मं रूम्हणा), डॉ. विजयजी नागरे सर (प्राचार्य नारायणराव नागरे महाविद्यालय ) , श्री. दत्तात्रयजी वाघमारे सर ( किनगावराजा पो. स्टेशन) हे प्रमूख पाहूणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरवात ही श्रीगणेश वंदनाने करण्यात आली. यावेळी शाळेतील वर्ग नर्सरी ते सहावीच्या विद्यार्थ्यांनी विविध नृत्याविष्कार दाखवत पालकांची व प्रेक्षकांची मने जिंकली. यामध्ये लोकनृत्य, देशभक्तीपर गीत, समाज जागृती चे नाट्य, शेतकरी नृत्य, देशभक्तिपर नाटिका, चित्रपटातील गाणे यावर नृत्य व अयोध्या श्रीराम लला च्या धर्तीवर रामलीला सादर करण्यात आली . तसेच यासारखे एकाहून एक सरस कलाविष्कार सादर केले व विविध कलाकृती सादर करून विद्यार्थ्यांनी प्रेक्षकांची दाद मिळविली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. शरयू जाधव यांनी केले यामध्ये त्यांनी संपूर्ण शालेय प्रगती, विद्यार्थ्याचा सर्वांगीण विकास,आणि मुलांची उल्लेखनीय कामगिरबद्दल माहिती देत संपूर्ण वार्षिक आढावा दिला व विद्यार्थांना प्रोत्साहन केले. तसेच कार्यक्रमाचे सूत्रसंचलन सौ. आशा सांगळे मॅडम, वर्ग सहावीच्या विद्यार्थीनी कु. अलिजा शेख, कु. खुशी झोटे व सौ. ज्योती घुगे मॅडम यांनी केले. तर डॉ. शिल्पाताई कायंदे मॅडम (संचालिका जि.इं.स्कूल) यांनी आभार प्रदर्शन केले.

तसेच कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्री.पि.एस.खार्डे, पि.पि.उगलमुगले सर, श्री.आर. आर.भुसारे सर, श्री. एस.के. कायंदे सर, श्री. उध्दव वाघ सर, सौ.हिना शेख मॅडम, सौ.अर्चना ढाकणे मॅडम, सौ.जयश्री देशमुख मॅडम, सौ.सरिता काळे मॅडम, सौ. सविता उगलमुगले मॅडम, सौ. अश्विनी अढाव मॅडम, सौ. प्रिती तिपाले मॅडम, ऋषी घुगे, शुभम चापाईतकर आदींनी परिश्रम घेतले.

# डाक विभागातर्फे महामेळावा उत्साहात....

**जनसंचलन/बुलडाणा**

डाक विभागातर्फे या आर्थिक वर्षात नया साल, नया जोश हा उपक्रम दि. २९ जानेवारी २०२४ ते २९ फेब्रुवारी २०२४ पर्यंत राबविण्यात येत आहे. नागरिकांना डाक विभागाच्या सेवांचा लाभ मिळावा, तसेच वित्तीय समावेशन व्हावे, यासाठी बुलडाणा येथील डाक विभागात शनिवारी, दि. १७ फेब्रुवारी रोजी डाक महामेळावा पार पडला. यावेळी सहायक डाक निर्देशक दिलीप खाडे, सहाय्यक अधिक्षक डाकघर जयंत दाऊ, डाक अधिक्षक गणेश अंभोरे उपस्थित होते. श्री. खाडे म्हणाले, डाक विभाग आधुनिकीकरणाची कास धरत आहे. तसेच सर्व सेवा नागरिकांपर्यंत पोहोचत आहे. तसेच श्री. दाऊ यांनी आजच्या संगणकाच्या युगातही डाक विभागाने आपली विश्वासार्हता जपल्याचे सांगितले. श्री. आंभोरे यांनी डाक विभागाच्या योजनांची माहिती दिली. या योजना तळागाळातील नागरिकांपर्यंत पोहचविण्याचे आवाहन केले. तसेच भविष्यातही डाक विभाग जनसामान्यांना विविध सेवा प्रदान करण्यासाठी कटीबद्ध राहिल, असे आश्वासन दिले. प्रल्हाद कचरे यांनी सूत्रसंचालन केले. या योजना नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी बुलडाणा डाक विभागाने दि. २९ जानेवारी २०२४ पासून दि. १६ फेब्रुवारी २०२४ पर्यंत बचत व तत्सम ४२ हजारापेक्षा जास्त खाती काढून महाराष्ट्र

भारतीय डाक
Indian Post

सर्कलमध्ये प्रथम स्थान प्राप्त केले आहे. डाक विभागातर्फे ग्राहकांसाठी विविध लोकोपयोगी योजना राबविल्या जातात. त्यात नागरिकांचे वित्तीय समावेशन करण्याच्या उद्देशाने भारतीय डाक विभागाद्वारे बचत बँक, आवर्ती जमा, सावधि जमा, महिला सन्मान, सुकन्या, किसान विकास पत्र, राष्ट्रीय बचत पत्र, ज्येष्ठ नागरिक बचत योजना आदी योजना पुरविल्या जातात.

# तुपकरांना जेल की बेल..? फैसला येणार २१ फेब्रुवारीला...

**जनसंचलन/बुलढाणा**

आंदोलनातील गुन्ह्यात रविकांत तुपकर यांना दिलेला जामीन रद्द करण्याबाबतचे प्रकरण सध्या न्यायालयात सुरू आहे. ७ व ८ फेब्रुवारी या प्रकरणी सुनावणी झाली आणि त्यानंतर १५ व १६ फेब्रुवारी रोजी झालेल्या सुनावणीत देखील या प्रकरणी दोन्ही पक्षाकडून जोरदार युक्तिवाद करण्यात आला. दोन्ही पक्षांचा युक्तिवाद ऐकल्यानंतर आता न्यायालय या प्रकरणाचा अंतिम निकाल २१ फेब्रुवारी रोजी देणार आहे. तुपकरांना तुरुंगात जावे लागणार.? की त्यांना जमीन मिळणार..? याचा फैसला आज समोर होणार आहे. हा फैसला येण्यापूर्वी रविकांत तुपकर



सकाळी ९.३० वाजता त्यांच्या निवासस्थानी कार्यकर्त्यांची चर्चा करणार आहेत व त्यानंतर न्यायालयात हजर होणार आहेत आता नेमका याप्रकरणी काय निकाल लागतो याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागून आहे.

# भ्रष्टाचाऱ्यांचा एकच नारा,तुरुंगापेक्षा भाजप बरा,

# शरद पवारांकडून मोदींवर सडकून टीका...

वृत्तसंस्था/कोल्हापूर

कामगार नेते स्वर्गीय गोविंद पानसरे यांची हत्या होऊन नऊ वर्षे झाली तरी त्यांच्या मारेकऱ्यांना शिक्षा देण्यात सर्वच यंत्रणा अयशस्वी ठरल्या आहेत. मात्र त्यांची हत्या झाली असली तरी गोविंद पानसरे यांचे कार्य, रस्त्यावरील संघर्ष हे त्यांचे अनुयायी आज ही पुढे घेऊन जात आहेत. कॉ. गोविंद पानसरे यांचे कार्य आणि संघर्ष नव्या पिढीला कळावे व प्रेरणा मिळावी, यासाठी कोल्हापुरात त्यांच्या स्मारक उभारण्यात आले असून स्मारकाचा उद्घाटन सोहळा ज्येष्ठ नेते खासदार शरद पवार यांच्या हस्ते व शाहू छत्रपती यांच्या अध्यक्षतेखाली प्रतिभानगर येथील वि. स. खांडेकर प्रशालेच्या प्रांगणात पार पडला. नऊ वर्षापूर्वी कॉम्रेड गोविंद पानसरे हे मॉर्निंग वॉकला गेले असताना त्यांच्यावर गोळ्या घालून हत्या करण्यात आली होती. आज या घटनेला नऊ वर्ष पूर्ण झाली. मात्र अद्याप मारेकरी मोकाट फिरत असून तपास यंत्रणांना अद्याप मारेकरीपर्यंत पोहोचण्यात अपयश आले आहे. मात्र नऊ वर्षांपूर्वी त्यांची हत्या झाल्यानतर कोल्हापूर महानगरपालिका पदाधिकाऱ्यांनी सामाजिक जाणिवेचे तसेच गोविंद पानसरे यांच्या सार्वजिक कार्याचे भान ठेवून त्यांच्या हत्येनंतर झालेल्या शोकसभेत उचित असे स्मारक उभे करण्यात पुढाकार घेईल असे आश्वासन दिले होते. त्यानुसार ३५ लाखांचा निधी उपलब्ध करून दिला होता.कमी पडणारा २५ लाखांचा निधी आमदार सतेज पाटील यांनी जिल्हा नियोजन मंडळातून उपलब्ध करून दिला आणि यातून कॉम्रेड गोविंद पानसरे यांचे भव्य स्मारक उभारण्यात आले असून त्याचे लोकार्पण सोहळा आज खासदार शरद पवार यांच्या हस्ते तसेच शाहू छत्रपती यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. यावेळी या सोहळ्यास भाकपचे जनरल सेक्रेटरी खासदार डी. राजा, राज्याचे जनरल सेक्रेटरी भालचंद्र कानगो, कॉंग्रेस नेते बाळासाहेब थोरात, आमदार सतेज पाटील, आमदार पी. एन. पाटील, आमदार ऋतुराज पाटील, डॉ. जयसिंगराव पवार, मेघा पानसरे तसेच कॉ. पानसरे अनुयायी उपस्थित होते.कॉम्रेड पानसरे यांच्या स्मारकाच्या लोकार्पणानंतर खासदार शरद पवार यांनी अनुयायांशी संवाद साधताना हा आजचा अत्यंत महत्त्वाचा दिवस असून पानसरे, दाभोळकर यांच्यावर हल्ला करत पुरोगामी विचार संपवण्याचा प्रयत्न काही जणांनी केला. मात्र विचाराची संघर्ष करायचा असेल तर विचाराने करायला हवं मात्र ज्यांच्याकडे विचार नाही, अशा प्रवृत्तीने कायदा हातात घेऊन असा भ्याड हल्ला करू शकतात, हे त्याचे उदाहरण आहे. आज प्रतिगामी शक्ती या वाढत आहेत. ज्यांच्या हातात सत्ता आहे. त्यांना पुरोगामी विचारांची किंचित सुद्धा आस्था नाही.सदेच्या अधिवेशनात जिथे सामान्य माणसाच्या व्यथा मांडल्या जातात, देशाच्या धोरणाचे चर्चा केली जाते अशा लोकशाहीच्या मंदिरात देशाचे प्रमुख प्रधानमंत्री केवळ वीस मिनिटांसाठी येतात. बाकी वेळेस ते सभागृहाकडे ढुंकूनही पाहत नाहीत. असे असले तरी त्यांनी संसदेच्या पहिल्या दिवशी संसदेच्या पायरीवर साष्टांग नमस्कार करतील व लोकांना काहीतरी वेगळा संदेश देतील. या सर्व गोष्टी ते स्वतःच्या राजकीय विचारांना घेऊन लोकांना धर्माकडे नेण्याच्या प्रयत्न करत आ-हेत. सध्या सत्तेचा गैरवापर सातत्याने होत आहे आवाज दाबणे, लेखनावर निर्बंध आले असे प्रकार सुद्धा होत आहेत. अशा





प्रतिगामी शक्ती विरुद्ध संघर्ष करण्याची ही वेळ आहे, असे म्हणत भाजपवर त्यांनी जोरदार टीका केली आहे.ते म्हणाले की. तसेच त्यांनी केंद्रीय तपास यंत्रणा व त्याच्या वापराबाबत देखील भाष्य केले असून सत्तेचा गैरवापर करून भाजपकडून झारखंड मधील आदिवासी मुख्यमंत्र्यांचा काहीच कारण नसताना त्यांच्यावर खोटे केसेस घालून तुरुंगात डांबले जात आहे. दिल्लीमध्ये काम करणारे मुख्यमंत्री केजरीवाल हे प्रतिगामी शक्ती विरुद्ध भूमिका मांडत असल्याने त्यांना आणि त्यांच्या सहकाऱ्यांना तुरुंगात डांबण्याचा प्रयत्न होत आहे.सत्ताधारीविरोधात वेगळी भूमिका घेणाऱ्यांवर ईडी व अन्य संस्थांमार्फत दबाव आणण्याचा प्रयत्न सत्तेतील लोकांकडून होत आहे. यामुळे ‌‌भ्रष्टाचार्यांचा एकच नारा, तुरुंगापेक्षा भाजप बरा‌‌ असे नारे दिले जात असून भाजपकडून असे चित्र तयार केले जात आहे. हा संघर्ष केवळ निवडणुकांपुरता सीमित नाही तर ज्यांच्या विरुद्ध अन्याय होतो त्यांच्या मागे मोठी शक्ती उभे करण्याचे भूमिका आपण घेतली पाहिजे यासाठी सर्व प्रादेशिक शक्ती एकत्र आणल्या पाहिजेत. असेही यावेळी खा. शरद पवार म्हणाले आहेत.

## संदीप शेळके यांच्या परिवर्तन यात्रेला शेगावात उत्कृष्ट प्रतिसाद

## खासदारकीची संधी मिळाल्यास जिल्ह्याचा सर्वांगीण विकास करू - संदीप शेळके...

जनसंचलन/ शेगाव

वन बुलढाणा मिशनच्या परिवर्तन रथ यात्रेला शेगावात उदंड प्रतिसाद मिळाला आहे. शेगाव तालुक्यातील अनेक गावात सभा गाजल्या असून अनेकांनी बुलडाणा जिल्ह्याच्या खासदारकीसाठी संसदेत पाठवायची शपथ संदीप शेळके यांना दिली आहे. अवकाळी ने खचलेल्या शेतकऱ्यांच्या बांधावर पोहचून त्यांना धिर दिला तसेच शासनाने शेतकऱ्यांना स्पेशल पॅकेज जा-हीर करून त्यांना सन्मानाने जगता येईल असेही धोरण आखावे अशीही मागणी केली आहे. तसेच जानोरी येथील हाऊस फुल जाहीर सभा संदीप शेळ-के यांच्या रोखठोक भाषणांनी गाजली आक्रमकपणे बोलताना संदीपदादांनी शेतकरी, कष्टकरी अन बेरोजगार युवकांच्या व्यथा, वेदना, समस्यांना तोंड फोडताच जिल्ह्यातील नेत्यांवर टीकेचा आसूड उगारला होता. जिल्ह्या-



तील शेतकरी चौफेर संकटात अडकला आहे. यामुळे जगाचा पोशिंदा समजल्या जाणाऱ्या बळीराजाच्या हाल अपेक्षांना पारावार उरला नाही असे भीषण चित्र असताना जिल्ह्याचे खासदार संसदेत तर आमदार विधानसभेत मूग गिळून बसतात. मौनव्रत धारण करून त्यावर आवाज उठवत अशा विविध टीकेचा स्त्रोत संदीप शेळके यांनी बोलून दाखव-ला होता.हे चित्र बदलण्यासाठी परिवर्तन ही काळाची गरज ठरली आहे. यामध्ये मला खासदारकीची संधी दिली तर जिल्ह्याचा चौफेर विकास करण्यासाठी आपण प्रयत्नांची पराकाष्टा करू अशी ग्वाही त्यांनी दिली. यावेळी गांधी चौक, शिवनेरी चौक अश्या विविध सभेंना नागरिकांनी उत्स्पूर्त प्रतिसाद देत आगामी लोकसभा निवडणुकीत संदीप शेळके यांना लोकसभेवर पाठवायचे बोलून दाखवले आहे. शेळके यांच्या परिवर्तन यात्रेला शेगावात उत्कृष्ट प्रतिसाद मिळाल्याचे दिसून आले.

## बुलढाणा शिवसेनेच्या बालेकिल्ल्यात उद्धव ठाकरेंची तोफ धडाडणार...

## येणाऱ्या लोकसभेसाठी उ.बा.ठा. शिवसेना झाली सज्ज...



जनसंचलन/बुलढाणा

बुलडाणा जिल्ह्यातले दोन आमदार आणि एक खासदार उद्धव ठाकरेंची साथ सोडून एकनाथ शिंदेंसोबत गेले आहेत. बुलडाण्याचे आमदार संजय गायकवाड आणि मेहकरचे आमदार संजय रायमुलकर तसेच खासदार प्रतापराव जाधव एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेसोबत आहेत. खासदार प्रता-पराव जाधव यांनी काही दिवसांपूर्वीच ठाकरेंसोबत असलेले काही आमदार आणि खासदार आपल्या संपर्कात असून, ते लवकरच शिंदे गटाकडे येणार असल्याचा गौप्यस्फोट केला होता. या सर्व विषयांना उत्तर देण्यासाठी पक्षप्रमुख उद्धव ठकरे २२ व २३ फेब्रुवारी असे दोन दिवस बुलडाणा जिल्ह्यात येत आहेत. बंडखोरांच्या होमटाऊनमध्ये ते प्रत्येक आरोपांचे उत्तर कसे देणार? याकडे शिवसैनिकांचे लक्ष लागले आहे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====

संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958